नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

| वर्ष - ३ रे<br>Year - 3rd | अंक - ३<br>Issue - 3 | वार मंगळवार दि. २० मे २०२५<br>Blow- Tuesday Date 20 May 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com<br>वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४<br>Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये<br>Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026<br>ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|

# शेतकऱ्यांना सिबिल स्कोअरची अट न घालता कर्ज पुरवठा करा




## कृषी कर्ज पुरवठ्यावरून मुख्यमंत्र्यांनी बँकांना ताकीद; सन २०२५-२६ च्या ४४ लाख ७६ हजार ८०४ कोटींच्या पत पुरवठा आराखड्यास मंजुरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : शेतकऱ्यांना कृषी कर्जाचा पुरवठा झाला नाही तर त्याचे दुष्परिणाम अर्थव्यवस्थेसोबतच शेतकऱ्यांवरही होतात. त्यामुळे शेतकऱ्यांना सिबिल स्कोअर मागू नका. बँकांना यापूर्वीही यासंदर्भात सक्त ताकीद देण्यात आली आहे. यापूर्वी यासंदर्भात निर्देश न जुमानणाऱ्या बँकावर 'एफआयआर' देखील दाखल केले आहेत. रिझर्व्ह बँकेने सुद्धा कृषी कर्जाबाबत स्पष्टता दिली आहे. जर कोणती बँक शाखा सिबिल स्कोअर मागत असेल तर त्या शाखेवर कारवाई करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. तसेच कृषी कर्ज पुरवठा वाढवण्यासाठी राष्ट्रीयकृत बँकांनी विशेष प्रयत्न करून यंदाच्या वर्षी दिलेले उद्दिष्ट पूर्ण करावे, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

राज्यस्तरीय बँकर्स समितीची १६७ वी बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे झाली. यावेळी राज्याचा सन २०२५ -२६ या वित्तीय वर्षाचा ४४ लाख ७६ हजार ८०४ कोटी रुपयांचा पतपुरवठा आराखडाही बैठकीत मंजूर करण्यात आला.

**राष्ट्रीयकृत बँकांनी कृषी कर्ज पुरवठा वाढवण्यावर भर द्यावा**

महाराष्ट्र हे देशातील आघाडीचे राज्य असल्याचे सांगून मुख्यमंत्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शेतकरी हा राज्याचा कणा असून कृषी व्यवसाय हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा एक महत्वाचा भाग आहे. या भागाकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. त्यामुळे राष्ट्रीयकृत बँकांनी कृषी कर्ज पुरवठा वाढवण्यावर भर द्यावा. हवामान विभागाने यंदा चांगल्या पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर बँकांनी शेतकऱ्यांना अधिक सहकार्य करायला हवे. चांगला पाऊस झाला की कृषी विकासदर चांगला असतो. याचा लाभ बँकांनीही घ्यावा आणि शेतकऱ्यांनाही द्यावा. कृषी क्षेत्रामध्ये सध्या गुंतवणूक धोरण राबवण्यात येत आहे. त्यामध्ये बँकांची भूमिका महत्त्वाची असून त्यांनी या गुंतवणूकीमध्ये सहभागी व्हावे. कृषी क्षेत्रामध्ये किमान ५ हजार कोटी प्रतिवर्षी गुंतवणुकीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यामुळे या क्षेत्रामध्ये आता गुंतवणुकीला नवीन संधी उपलब्ध असणार आहेत. त्यामुळे बँकांनी शेतकऱ्यांना जास्तीतजास्त पतपुरवठा करावा. त्याचा बँकांना फायदाच होणार आहे. कृषी क्षेत्र आता फक्त सहाय्यक आणि पुनर्वसनात्मक असणार नाही तर एक व्यवसाय म्हणून त्याकडे पाहण्यात येईल. यामध्ये बँकांनी त्यांची भूमिका पार पाडावी. शेतकऱ्यांसाठी आणि या योजनांमध्ये चांगले काम करणाऱ्यांना सन्मानित करण्याचे धोरण ठरवावे. जेणेकरून आणखी चांगले काम करण्याची प्रेरणा मिळेल. जे चांगले काम करणार नाहीत त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

**पर्यटन, सेवाक्षेत्र आणि स्टार्ट-अप्सवरही बँकांनी लक्ष केंद्रित करावे**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्राने अर्धा ट्रिलीयन अर्थव्यवस्थेचा टप्पा पार केला असून एक ट्रिलीयन अर्थव्यवस्था होण्याकडे वेगाने वाटचाल सुरू आहे. एक ट्रिलीयन अर्थव्यवस्था होण्यामध्ये बँकांची भूमिका महत्वाची आहे. थेट परकीय गुंतवणुकीमध्ये महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे. दावोसमधून राज्यात १६ लाख कोटींची थेट गुंतवणूक आली आहे. महाराष्ट्र आता स्टार्टअप्सची राजधानी आहे. या क्षेत्राकडे ही बँकांनी लक्ष द्यावे. त्यातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होणार आहे. 'एमएसएमई'मध्येही राज्य प्रथम क्रमांकावर असून त्यामध्ये गुंतवणुकीस चांगल्या संधी आहेत. बँकांनी आणि शासनाने मिळून 'एमएसएमई'च्या केंद्र आणि राज्याच्या योजनांचा लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी एकत्र प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यामुळे राज्यासह देशाची अर्थव्यवस्था मजबूत होण्यास मदत होणार आहे. तसेच पर्यटन, सेवा क्षेत्र यावर बँकांनी प्रथमिकतेने लक्ष केंद्रीत करावे असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. (पान २ वर....)

# पॉलिटेक्निक प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया आजपासून सुरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




मुंबई : पॉलिटेक्निक पदविका अभ्यासक्रम हा नोकरी आणि उद्योगासाठी उपयुक्त पर्याय असून दहावीनंतर अभियंता होण्याचा मार्ग खुला करणाऱ्या पॉलिटेक्निक पदविका अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया येत्या २० मे २०२५ पासून सुरू होत असल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी दिली.

पॉलिटेक्निक पदविका अभ्यासक्रम हा नोकरी आणि उद्योगासाठी उपयुक्त पर्याय असून, अल्पकालावधीत तांत्रिक कौशल्य मिळवून रोजगार किंवा उद्योजकतेकडे वाटचाल करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पदविका अभ्यासक्रम शिक्षण महत्त्वाचे आहे. माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक क्षमतांनी सज्ज करणाऱ्या या अभ्यासक्रमामध्ये अधिकाधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा, असे आवाहन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

### पदविका अभ्यासक्रम नोकरी व उद्योगासाठी उपयुक्त पर्याय; अधिकाधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा - मंत्री चंद्रकांत पाटील

तंत्र शिक्षण संचालनालयाने पदविका अभ्यासक्रमांमध्ये १०० टक्के प्रवेश सुनिश्चित करण्याचे उद्दिष्ट ठेवावे. विद्यार्थ्यांना या शाखेकडे आकर्षित करण्यासाठी सर्व महाविद्यालयांनी प्रयत्न करावेत. दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी अभियांत्रिकी, तंत्रज्ञान व वास्तुकला विषयक तीन वर्ष कालावधीच्या पदविका अभ्यासक्रमामार्फत विद्यार्थी तंत्रज्ञ, अभियंता व यशस्वी उद्योजक होऊ शकतात, असेही श्री.पाटील सांनी सांगितले. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेचा तपशील, वेळापत्रक, नाव नोंदणी व अर्ज भरण्यासाठी हींींिः//वींश.ारहरीरिहींीर.सीं.ळप या अधिकृत संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन विभागामार्फत करण्यात आले आहे.

# जालन्यात वादळी पावसाचा कहर! शेतात काम करताना वीज कोसळून दोघांचा मृत्यू, ४८ तासांत ४ जण दगावले



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जालना : राज्यभरात वादळी वाऱ्यासह तुफान पावसाने हजेरी लावली असून जालना जिल्ह्यात अवकाळी पावसाने कहर केलाय. सलग पाचव्या दिवशी जालन्यात तुफान पाऊस सुरू असून भोकरदन तालुक्यातील पिंपळगाव रेणुकाई शिवारात आज वीज पडून दोन तरुणांचा मृत्यू झालाय .एक जण गंभीर जखमी आहे . गेल्या दोन दिवसात जालन्यात वीज पडून एकूण चार जणांचा मृत्यू झाला आहे .

गणेश जाधव(३२) सचिन बावस्कर (२८) अशी मृतांची नावे असून शेतात काम करत असताना अचानक वीज कोसळल्याने ही दुर्घटना घडली आहे . रविवारीही जालन्यात वीज पडल्याने दोन जणांचा मृत्यू झाला होता . गेल्या पाच दिवसांपासून जिल्ह्यात सर्व दूर जोरदार अवकाळी पाऊस पडतोय . यामुळे फळ पिकांचे मोठे नुकसान झाले आहे . गेल्या काही दिवसांपासून राज्यातील अनेक भागात जोरदार अवकाळी पावसाची हजेरी लागली आहे . वादळी वाऱ्यांसह मराठवाड्यात अनेक ठिकाणी जोरधारा सुरू आहेत . २२ मे रोजी कर्नाटक जवळ अरबी समुद्रात कमी दाबाचे क्षेत्र तयार होणार आहे. त्याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात १९ मे ते २५ मे दरम्यान पावसाचा जोर वाढणार असल्याची माहिती हवामान विभागानं दिली आहे.

**भोकरदनमध्ये दोन ठार**

जालना जिल्ह्यात रविवारी दुपारनंतर अवकाळी पावसाने हजेरी लावली . भोकरदन तालुक्यात वीज कोसळून दोन जण मृत्युमुखी पडले होते .अनेक जनावरे दगावली असून शेती पिकांचेही मोठे नुकसान झाले आहे . झोपडीवर वीज कोसळल्याने भोकरदन तालुक्यातील राहुल विठ्ठल जाधव १९ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला .तर भायडी गावच्या शिवारात वीज पडल्याने रामदास कड यांचा मृत्यू झाला होता. या घटनेने परिसरात शोककळा पसरली आहे. जालना जिल्ह्यात गेल्या पाच दिवसांपासून विविध तालुक्यांमध्ये विजांसह जोरदार अवकाळी पाऊस होत आहे. त्यामुळे केळी, द्राक्ष, भाजीपाला अशा फळपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. जालना, बदनापूर, अंबड, भोकरदन आणि जाफराबाद तालुक्यांतील शेतकरी यामुळे सर्वाधिक प्रभावित झाले आहेत. या भागांमध्ये फळपिके मोठ्या प्रमाणावर घेतली जात असल्याने नुकसानाचे प्रमाणही अधिक आहे. अनेक ठिकाणी आंब्याच्या कैऱ्या झाडावरून खाली पडून जमिनीवर फेकल्या गेल्याचे दिसून आले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मेहनतीवर पाणी फिरल्याचं चित्र आहे. मोसंबी आणि डाळिंब पिकांनाही वाऱ्यामुळे फळगळ होऊन नुकसान सहन करावं लागलं.

# वादळी वाऱ्यासह तुफान पाऊस, झाडे उन्मळून पडली, दुकानांचे पत्रे उडाले, नागरिकांची उडाली धांदल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



राहाता : राहता तालुक्यात जोरदार पावसाला सुरुवात झाली असून वादळी वाऱ्यांमुळे घराचे पत्रे उडाले, झाडे उन्मळून पडली.

आज दुपारच्या सुमारास राहाता तालुक्यात वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने मोठे नुकसान झाले आहे.. वाऱ्याचा वेग इतका प्रचंड होता की काही ठिकाणी झाडे उन्मळून पडली आहेत अवकाळी पावसानं शेतकऱ्यांचं मोठं नुकसान केलं आहे. दरम्यान, पूर्वमोसमी पावसाचीही हजेरी लागली. साकुरी गावात अनेक वर्षे जुने वडाचे झाड ग्रामदैवत विरभद्र महाराजांच्या मंदिरावर (पान २ वर...)

# अणवस्त्र हल्ल्याची भारताला कसलीही धमकी नाही : मिस्त्री

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली: भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्धजन्य परिस्थिती निवळली असून दोन्ही देशांनी युद्धविरामाची माहिती दिली. मात्र, ऑपरेशन सिंदूर हे स्थगित करण्यात आलं असून दहशतवादाविरुद्ध भारताची लढाई सुरूच राहणार असल्याचे भारताने पाकिस्तानला ठणकावून सांगितले आहे. आता, ऑपरेशन सिंदूरवेळी भारत सरकारने घेतलेल्या भूमिका आणि भारतीय सैन्य दलाने दाखवलेल्या शौर्याची माहिती जगासमोर येत आहे. तसेच, ससंदीय समितीसमोर देखील देशाचे परराष्ट्र सचिव यांनी भारत-पाकिस्तान सैन्य दल कारवाईच्या संदर्भात माहिती दिली. त्यावेळी, (पान २ वर...)

## मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणमधील महापालिका आयुक्तांची बैठक

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

# राज्याचे 'पार्किंग' धोरण लवकरच आणणार




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : वाहनांच्या पार्किंगची समस्या दिवसेंदिवस बिकट होत चालली असून राज्यातील मोठ्या शहरांमध्ये अनधिकृत पार्किंगमुळे वाहतुक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. भविष्याचा विचार करता लवकरच राज्यासाठी 'एकात्मिक पार्किंग धोरण' आणण्याचा विचार परिवहन विभाग करत आहे. या धोरणाची प्राथमिक अंमलबजावणी मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणामध्ये करण्यात येईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

या संदर्भात मंत्रालयात आयोजित मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणमधील महापालिका आयुक्तांच्या बैठकीमध्ये श्री. सरनाईक बोलत होते. बैठकीस परिवहन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांच्यासह एम.एम.आर.डी.ए. मधील सर्व महापालिका आयुक्त उपस्थित होते.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, एकात्मिक पार्किंग धोरण आणण्याआधी अंमलबजावणी दृष्टीने कोणती त्रुटी राहू नये. यासाठी ज्या महापालिका क्षेत्रामध्ये वाहतूक कोंडी समस्येने उग्र रूप धारण केले आहे, त्या महापालिका आयुक्तांच्या सूचना, अभिप्राय यांचा विचार होणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच वाहनधारकाकडे स्वतःची पार्किंग व्यवस्था नसेल, तर संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने व्यवस्था उपलब्ध करून देणे गरजेचे असून त्यादृष्टीने महापालिका क्षेत्रामध्ये अशा पार्किंग जागा विकसित करण्याला प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे. त्या अनुषंगाने राज्यासाठी पार्किंग धोरण तयार करत असताना सुरुवातीला मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणामध्ये येणाऱ्या महापालिकांमध्ये ते प्रभावीपणे राबवावे असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुचविले असल्याचेही श्री.सरनाईक यांनी सांगितले.

महापालिका क्षेत्रामध्ये पार्किंगच्या समस्येमुळे निर्माण होणाऱ्या अडचणी आणि त्यावर मात करण्यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांनी सुचवलेल्या सूचना तसेच अभिप्राय यांचा येणाऱ्या पार्किंग धोरणामध्ये समावेश केला जाईल, असे श्री. सरनाईक यांनी यावेळी सांगितले.

परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले की, प्रत्येक महापालिकेने त्यांच्या उद्यान आणि मैदानाच्या खाली पार्किंगची व्यवस्था निर्माण होईल, अशा पद्धतीने रचना करावी. ठाणे महापालिकेने मैदानाच्या खाली तयार केलेले वाहनतळ त्याचे उत्तम उदाहरण आहे. तसेच रस्त्यावरील अनधिकृत पार्किंग हटवण्यासाठी पोलीस प्रशासन व मोटार वाहन विभागाच्या मदतीने प्रभावी अंमलबजावणी करावी. रस्तयावर अनेक वर्ष बंद असलेली वाहने तातडीने टोईंग करून हलवण्यात यावीत, रस्ते मोकळे करावेत. विकास आणि सुविधासाठी आरक्षित असलेल्या जागेवर पार्किंग प्लाझा उभारण्यात यावेत. यासाठी मुंबई महापालिकेने उभारलेले पार्किंग प्लाझा धोरण इतर महापालिकांनी स्वीकारावे, जेणेकरून भविष्यात शहराची पार्किंग समस्या कमी होण्यास मदत होईल, असेही परिवहन मंत्री श्री. सरनाईक म्हणाले.

## थोडक्यात...

### भिवंडी कल्याण मेट्रो मार्गावर डबल डेकर इंटिग्रेटेड उड्डाणपूल उभारण्याची खासदार बाळ्या मामा यांची मागणी

ठाणे प्रतिनिधी /मिलिंद जाधव

भिवंडी कल्याण महामार्गावर नेहमीच वाहतूक कोंडी होत असून या वाहतूक कोंडीतून प्रवाशांसह नागरिकांची सुटका व्हावी



यासाठी मेट्रो पाच प्रकल्पाच्या मार्गातील रांजनोली,कोनगाव ते कल्याण दरम्यान नागपूरच्या धरतीवर डबल डेकर इंटिग्रेटेड उड्डाणपूल उभारावे अशी मागणी भिवंडी लोकसभा मतदार संघाचे खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

भिवंडीत वाहतूक कोंडीची समस्या गंभीर झाली असून कल्याण भिवंडी प्रवासात नेहमीच वाहतूक कोंडीच्या समस्यांचा प्रवाशांना सामना करावा लागत आहे.यासाठी एमएमआरडीए माध्यमातून भिवंडी रांजनोली कोनगाव कल्याण असा मेट्रो ५ प्रकल्प प्रस्थापित आहे. या प्रकल्पात डबल डेकर इंटिग्रेटेड उड्डाणपूल केल्यास येथील नागरिकांसह प्रवाशांचा प्रवास सुखकर व वेगवान होणार असल्याने यासंदर्भात खासदार बाळ्या मामा यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन यासंदर्भातील मागणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली असता शिंदे यांनी तत्काळ एमएमआरडीए च्या अधिकाऱ्यांना या संदर्भातील प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे लवकरच या मार्गावरून वरील वाहतूक कोंडीचे समस्या संपणार असल्याचे मत खासदार बाळ्या मामा यांनी व्यक्त केले आहे.

# प्रधानमंत्री पिक विमा योजना लागू

## पिक विमा देण्याबाबत ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी या विमा कंपनीस दिले आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : प्रधानमंत्री पिक विमा योजना २०१६ पासून राज्यात व सोलापूर जिल्ह्यात लागू करण्यात आली आहे. या योजनेत सहभागी शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती, कीड व रोगासारख्या अकल्पित प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास विमा संरक्षण देण्यात येते. प्रधानमंत्री पिक विमा योजनेत जोखमीच्या पाच बार्बीचा समावेश आहे. हवामान घटकाच्या प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकाची पेरणी अथवा लावणी न झाल्यामुळे होणारे नुकसान, हंगामातील प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकाचे होणारे नुकसान, पीक पेरणी पासून काढणी पर्यंत च्या कालावधीत पिकाच्या उत्पन्नात येणारी घट या जोखमीच्या बाबी सर्व समावेशक असून यासाठी कोणतीही पूर्व सूचना देण्याची आवश्यकता नाही. स्थानिक नैसर्गिक आपती मुळे होणारे नुकसान व काढणी पश्चात नुकसान या जोखमीच्या बाबी करिता शेतकऱ्यांकडून पूर्व सूचना दिली जाते व वैयक्तिक स्तरावर विमा कंपनी प्रतिनिधी कडून पंचनामे करून नुकसान ठरवले होते.

खरीप व रब्बी हंगाम २०२३ मध्ये वर्षभरात सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून एकूण १५२७७५ पीक नुकसानीच्या पूर्वसूचना कंपनीकडे देण्यात आल्या त्यापैकी विविध कारणांमुळे १२०७१० पूर्वसूचना नाकारून कंपनीने शेतकऱ्यांना विमा नामंजूर केला. यामुळे जिल्ह्यातील बऱ्याच शेतकऱ्यांनी कृषी विभाग व महसूल विभागाकडे तक्रार केली. मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २२ ऑगस्ट २०२४ व २८ जानेवारी २०२५ रोजी जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीमध्ये तक्रारींची दखल घेऊन सदरील पीक नुकसानीच्या पूर्वसूचना स्वीकृत करून शेतकऱ्यांना पिक विमा देण्याबाबत ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी या विमा कंपनीस आदेश दिले आहेत. या आदेशाप्रमाणे विमा कंपनीने केलेल्या परिगणनेनुसार ६३००० शेतकऱ्यांचे अंदाजित ७५.५० कोटी रुपये असून याबाबत कंपनी राज्यस्तरावर अपीलात गेली आहे.

शेतकऱ्यांकडून देण्यात येणाऱ्या पिक नुकसानीच्या पूर्व सूचना बाबत मा. जिल्हाधिकारी श्री. कुमार आशीर्वाद यांनी वारंवार याबाबत आढावा घेवून, परिपत्रक काढून सीएससी केंद्र चालकांचे प्रशिक्षण, व्हाट्सअप ग्रुप द्वारे शेतकऱ्यांमध्ये जनजागृती, याम सुरक्षा यंत्राचा वापर, इत्यादी द्वारे पिक नुकसानीच्या पूर्व सूचना नाकारण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी सूचना दिलेल्या होत्या. विमा कंपनीस वेळोवेळी दिलेल्या सूचना, आदेश परिपत्रके, प्रशिक्षणे यामुळे खरीप २०२४ मध्ये पीक नुकसानीच्या पूर्वसूचना नाकारण्याचे प्रमाण कमी झाले आहे. खरीप २०२४ मध्ये शेतकऱ्यांकडून दिलेल्या ३०६००० पूर्वसूचनापैकी २२७००० (७४%) पूर्व सूचनांचा स्वीकार करून विमा कंपनी द्वारे २७८.७ कोटी रुपयांचा विमा मंजूर झाला आहे.

खरीप २०२४ मध्ये पीक नुकसानीचे पंचनामे व अहवाल तयार करण्यामध्ये अनियमितता असल्यामुळे विमा कंपनीकडे वारंवार स्थळ पंचनामा प्रत व छायाचित्रे याची मागणी वारंवार जिल्हास्तरीय आढावा बैठकीत करण्यात आलेली आहे परंतु अद्याप पर्यंत कंपनीकडून या बाबींची पूर्तता करण्यात आली नाही. दिनांक १६ मे २०२५ रोजी झालेल्या खरीप हंगाम पूर्व बैठकीमध्ये पुढील आठ दिवसात विमा कंपनीने स्थळ पंचनामा प्रति, विमा वाटप याद्या, रिजेक्शन याद्या व छायाचित्रे द्यावेत अन्यथा पिक विमा कंपनीविरुद्ध (जीळशपींरश्र खपीीीरपलश) गुन्हा दाखल करण्यातचे निर्देश मा. पालकमंत्री /मा. जिल्हाधिकारी यांनी दिले आहेत.

अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी दिली.

## श्री नवले गुरुजी यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दहिटणे : जि प शाळा दहिटणे च्या सन १९९८ -९९ बॅचच्या माझी विद्यार्थ्यांकडून त्यांचे गुरुवर्य श्री पुंडलिक नवले गुरुजी यांचा सेवानिवृत्ती निमित्त भव्य सत्कार करण्यात आला यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री अरुण पोपसभट गुरुजी, शकुंतला जोजन मॅडम, महादेव मैत्री गुरुजी, केंद्रप्रमुख श्री धडके साहेब, कोकणे मॅडम, वजीर शेख गुरुजी, विजय जोजन गुरुजी या सर्व गुरुवर्यांचा देखील विद्यार्थ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी या बॅचच्या विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा देखील आनंदात साजरा करण्यात आला .गुरुजन वर्गाने आपले मनोगत व्यक्त करताना जिल्हा परिषदेच्या माजी विद्यार्थ्यांकडून आपल्या शिक्षकांचा सत्कार करणे हे कदाचित महाराष्ट्रातील पहिलाच कार्यक्रम असेल असे म्हणाले .खूप सुंदर व सुरेख कार्यक्रमाचे नियोजन व सत्कार बद्दल गुरुजींनी या बॅचच्या विद्यार्थ्यांचे मनापासून खूप कौतुक केले व मनापासून खूप आभार मानले यावेळी या बॅचच्या विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकाबद्दल मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे आयोजन जि प शाळा इयत्ता चौथी सन १९९८-९९ च्या विद्यार्थ्यांनी केले.

यावेळी या बॅचचे विशाल पाटील, सतीश स्वामी, सागर शिंदे, अविनाश पाटील, हरून नदाफ, राम शिंदे, सुनंदा हुल्ले, वैशाली गोरे, वंदना गुजोटी, विजया बझले, कल्पना गाडेकर, अबिक घोडके, सुमीता हिरेमठ, यास्मीन शेख,कविता चौधरी. हे उपस्थितीत होते आणि या कार्यक्रमाची सांगता स्वादिष्ट भोजनाची झाली.

## मैंदर्गीत दूषित पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात-त्वरित कार्यवाही साठी इस्माईल आळंद यांची मुख्याधिकाऱ्यांकडे मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/तालुका प्रतिनिधी : दि १९- अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी येथील नागरिक दूषित पाण्याच्या गंभीर समस्येशी झुंज देत आहेत.सामान्य नागरिकांना निधान पिण्यासाठी शुध्द पाणी तरी देण्यात यावे.अशी मागणी येथील सामाजिक कार्यकर्ता इस्माईल आळंद यांनी नगर परिषद चे मुख्याधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

पावसामुळे घरातील नळातून गटाराचे पाणी येत असून, पाण्याचा रंग काळसर आणि फेसयुक्त असतो. हे पाणी दोन ठिकाणी असलेल्या खड्ड्यांमधून गळत असल्याने परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.दूषित पाण्यामुळे गंभीर आजार पसरण्याची शक्यता असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत आहे. इस्माईल आळंद यांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे संबंधित अधिकार्यांवर त्वरित कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. त्यांनी पाण्याच्या पाईपलाईनमधील खड्डे तातडीने बुजवून नादुरुस्त नळ पाईप दुरुस्त करण्याची



विनंती केली आहे. जर या समस्येवर तातडीने तोडगा काढला नाही, तर ते स्वतः दूषित पाण्याचे भांडे घेऊन कार्यालयावर निदर्शन करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

मैंदर्गीतील नागरिकांच्या या गंभीर समस्येकडे नगरपरिषदेने गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित उपाययोजना करणे उचित वाटत आहे.

## आक्काताई नेजे हायस्कूल दत्तवाड १९९२ दहावी माजी विद्यार्थी स्नेह मेळाव्याचे २५ मे रोजी आयोजन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : दत्तवाड तालुका शिरोळ येथील श्रीमती आक्काताई नेजे हायस्कुल येथे सन १९९१ - ९२ या वर्षाच्या दहावी बॅचच्या माजी विध्यार्थी ,विद्यार्थीनी यांचा स्नेह मेळावा गेट टुगेदर रविवार दिनांक २५ मे रोजी शाळेच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला आहे .अशी माहिती माजी विद्यार्थी चंद्रशेखर कलगी यांनी दिली आहे.

बसगोंडा पाटील, देवेंद्र चौगुले, शंकर कुंभार, राजू पाटील, युनुस कुरणे सचिन सिदनाळे. सुदर्शन पाटील, पुष्पा मगदूम, मेघना उपाध्ये , बाहुबली कमते, बाहुबली नेजे , श्रीकांत माने यांच्या सोबत दत्तवाड गावातील व परिसरातील सर्व माजी विद्यार्थी / विद्यार्थीनी यांनी पुढाकार घेऊन स्नेह मेळावा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

२५ मे रोजी सकाळी ८.०० वाजल्यापासून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या मध्ये सर्व माजी विद्यार्थी / विद्यार्थीनी चा परिचय त्यांचे मनोगत व आदर्श गुरुजनांचा विशेष सत्कार , सांस्कृतीक कार्यक्रम, स्नेह भोजन आदी कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे.

या स्नेह मेळाव्याचे खास निमंत्रण शाळेचे विद्यमान मुख्याध्यापक प्राचार्य , निवृत्त अध्यापिका बरगाले मॅडम , वनकोरे मॅडम . नाना अंबुपे सर यांना देण्यात आले आहे . तसेच १९९२ बॅच ला शिकवणाऱ्या सर्व निवृत्त अध्यापकांना निमंत्रण देण्यात येणार आहे.

या स्नेह मेळ्यात सन १९९१/९२ चे सर्व माजी विद्यार्थी / विद्यार्थीनी , इयत्ता पाचवी ते दहावी पर्यंत चे सर्व विद्यार्थी यांनी सहभाग घ्यावा व परत एक दिवसाची शाळेचा अनुभव व निखळ मैत्री च्या आठवणीं आणि पुन्हा बाल वयात रममान होण्याचा आनंद घ्यावा असे अवाहन दत्तवाड व परिसरातील माजी विद्यार्थी यांनी केले आहे.

## करमाळ्यात बारावी व विविध क्षेत्रातील गुणवंतांचा सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

करमाळा (तालुका प्रतिनिधी )दहावी बारावी तसेच विविध क्षेत्रात गुणवत्ता मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ करमाळा येथील बौद्ध विहारात भारतीय बौद्ध महासभा तसेच विश्वभूषण डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती व सिद्धार्थ नगर आंबेडकर जयंती उत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झाला. यावेळी गुणवंतांना सन्मान ट्रॉफी तसेच पेन देऊन सत्कार करण्यात आला.

बहुजन समाजातील गुणवंताना प्रेरणा मिळावी तसेच प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण घेत यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी भारतीय बौद्ध महासभेच्या पुढाकाराने या कार्यक्रमाचे आयोजन करत असल्याची माहिती यावेळी केंद्रीय शिक्षक तालुकाध्यक्ष प्रशांत कांबळे यांनी दिली.

१०वी(Ssc)आदित्य संतोष कांबळे ९५.५०%, समृद्धी साळवे ९४.६०%, प्रज्ञा प्रशांत कांबळे ८३.४०%, अक्षरा भोसले कृष्णाली सूर्यकांत शिंदे, अक्षरा नितीन छाजलानी, रेणुका सुधीर मेहतर, नेहा सुधीर मेहतर, अनुष्का समिंदर

१२वी (Hsc):विजय राजदत्त कांबळे, कु बबली लोंढे या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच दत्तकला इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट आय.टी इंजिनिअरिंग असिस्टंट प्रोफेसर म्हणून अभिषेक राजदत्त कांबळे यांची नियुक्ती, महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय शिक्षक संघटनाजिल्हा उपाध्यक्ष किसन बबन कांबळे जो. शा. बा.शिक्षक पतसंस्था सोलापूर जिल्हा कार्यक्षेत्र संचालक पदी निवड आणि दि करमाळा अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड करमाळा यामध्येसंचालिका म्हणून तिसरी हॅट्रिक अति मताधिक्याने वंदना सुनील कांबळे यांची संचालिका पदी निवड झाल्याबद्दल त्यांचाही सन्मान यावेळी करण्यात आला. डॉक्टर राजदत्त कांबळे यांच्या परिवाराकडून बुद्ध विहारांमध्ये सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना व उपासक उपासिका यांना मिठाईचे वाटप करण्यात आले. भिमकन्या लेझीम संघाचे प्रमुख रमेश कांबळे तसेच समता सैनिक दलाचे प्रमुख महाराजा कांबळे यांनी उपस्थित आमचे स्वागत केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून दशरथ कांबळे, नागेश कांबळे, एस पी कांबळे, गौतम कांबळे

बौद्धाचार्य प्रशांत कांबळे,भारतीय बौद्ध महासभा सरचिटणीस भीमराव कांबळे,पत्रकार विशाल परदेशी,प्रफुल्ल दामोदरे,महाराजा कांबळे इ उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भिमराव कांबळे यांनी केले. यावेळी सिद्धार्थ नगर जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी विश्वभूषण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती चे पदाधिकारी तसेच विद्यार्थी व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**विविध उपक्रमांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती**

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती सिद्धार्थ मंडळ, कडवे यांच्या वतीने जल्लोषात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शाहूवाडी : दिनांक १७ व१८ मे २०२५ रोजी शाहूवाडी तालुक्यातील मलकापूर मधील गाव कडवे या ठिकाणी मोठ्या जल्लोषात साजरी करण्यात आली. कडवे गावामध्ये दोन गटांमध्ये वाद वर्षानुवर्षे चालत आले. त्याला आता पूर्णविराम मिळाला आहे. कडवे सिद्धार्थ मंडळाचे अध्यक्ष सुरेश गायकवाड महाराष्ट्र राज्याचे माजी वित्तीय सल्लागार व स्थानिक कार्यकर्ते यांच्या पुढाकाराने दोन्ही गटांमध्ये वाद मिटवून यावर्षी मोठ्या जल्लोषात एकत्र जयंती साजरी करण्यात आली.

दोन दिवसाच्या कार्यक्रमात ध्वजारोहण, शालेय विद्यार्थ्यांना वह्या वाटप, भोजनदान, असे अनेक कार्यक्रम घेण्यात आले. १७ तारखेला मोठ्या जल्लोषात ढोल ताशांच्या




गजरात मिरवणूक काढण्यात आली आणि १८ तारखेला ऑर्केस्ट्रा चे आयोजन करण्यात आले विविध कलाकारांनी आपल्या गाण्यांनी व नृत्यांनी सर्व नागरिकांचे मनोरंजन केले.

कार्यक्रम सहदेव गायकवाड, दत्तूराव गायकवाड, वसंत गायकवाड बबन गायकवाड, राजेंद्र गायकवाड सुनील गायकवाड किरण गायकवाड, प्रमोद गायकवाड व अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी उस्फूर्तपणे मोठ्या जल्लोषात पार पाडला.

## जुन्या तहसिलदार कार्यालयातील दुय्यम निबंधक कार्यालय प्रशासकीय इमारतीत स्थलांतरित करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ विनायक गायकवाड : जुन्या तहसिलदार कार्यालयात सुरु असलेले दुय्यम निबंधक तथा सब रजिस्ट्रार कार्यालय नविन प्रशासकीय इमारतीत तात्काळ स्थलांतरित करा अशी लेखी मागणी, विविध पक्ष संघटनेच्या वतीने उपविभागीय अधिकारी तथा प्रांत वर्षा लांडगे व पुरंदरचे तहसिलदार विक्रम राजपूत यांच्याकडे करण्यात आली.



### पुरंदर ::विविध पक्ष संघटनेची उपविभागीय अधिकारी पुरंदर यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

याबाबतचे निवेदन प्रांत कार्यालयातील प्रभारी नायब तहसिलदार राहुल जगताप यांनी स्विकारले , यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश सरचिटणीस विष्णूदादा भोसले, आचार्य अत्रे प्रतिष्ठानचे सहसचिव बंडूकाका जगताप , पुरंदर तालुका रिपब्लिकन पक्षाचे तालुका अध्यक्ष बळीराम सोनवणे, रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश संघटक सचिव गोविंद जगताप यांसह विविध मान्यवर उपस्थित होते.

सासवड येथे विविध शासकीय कार्यालयासाठी व नागरीकांना चांगल्या सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात या हेतूने, व नागरीकांचा वेळ वाचवा एकाच इमारतीत सर्व कार्यालयाती कामे नागरीकांना करता यावीत या उद्देशाने शासनाने भव्य अशी प्रशासकीय इमारत सर्व सोयी सुविधासह बांधली आहे, असे असताना, पुरंदर तालुक्यातील दुय्यम निबंधक तथा सब रजिस्ट्रार कार्यालय अजुनही जुन्या तहसिलदार कार्यालयात अपु - या जागेत, सुरु आहे. या ठिकाणी कोणत्याही सोयीसुविधा नाहीत त्यामुळे जुन्या तहसिलदार कार्यालयात सुरु असलेले दुय्यम निबंधक कार्यालय तात्काळ नवीन प्रशासकीय इमारतीत स्थलांतरित करा, अशी मागणी विविध पक्ष संघटनेच्या वतीने, पुरंदरचे उपविभागीय अधिकारी तथा प्रांत वर्षा लांडगे व पुरंदरचे तहसिलदार विक्रम राजपूत यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, सात दिवसांत जुन्या तहसिलदार कार्यालयातील दुय्यम निबंधक कार्यालय नविन प्रशासकीय इमारतीत स्थलांतरित केले नाही तर, पुरंदरच्या आम जनतेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा ही उपविभागीय अधिकारी तथा प्रांत पुरंदर व पुरंदरचे तहसिलदार विक्रम राजपूत यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

# जिल्हा नियोजन समिती बैठकीमध्ये आ.समाधान आवताडे हे जनतेच्या प्रश्नांसाठी ॲक्टिव्ह मोडवर

## पालकमंत्री ना.जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीमध्ये जिल्हा नियोजन समितीची बैठक संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : जिल्हा नियोजन समितीची बैठक आज राज्याचे ग्रामविकास व पंचायत राजमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना.जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत पार पडली. या बैठकीत आमदार समाधान आवताडे यांनी पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील अनेक विकासात्मक प्रश्नांवर आवाज उठवत लवकरात-लवकर योग्य ती कार्यवाही करुन जनतेच्या प्रश्नांचा निपटारा करण्याची मागणी केली असता मतदार संघातील सर्व प्रश्नांवर सकारात्मक तोडगा काढला जाईल अशी ग्वाही पालकमंत्री नामदार गोरे यांनी यावेळी दिली.

मंगळवेढा तालुक्यामध्ये सुरु असलेल्या नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या टँकरमध्ये वाढ करुन जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचाही समावेश करावा जेणेकरून जनावरांनाही पिण्यासाठी मुबलक पाणी उपलब्ध होईल. जिल्हा नियोजन समिती अंतर्गत शेतकऱ्यांना ट्रान्सफॉर्मर दिले जातात परंतु अधिकारी-ठेकेदार संगनमताने ते ट्रान्सफॉर्मर बसविण्यासाठी पैसे घेतात यावर लवकरात लवकर कारवाई केली पाहिजे.

मंगळवेढा टेल अंतर्गत १.२७ टीएमसी पाणी मंजूर असूनसुद्धा केवळ ०.२७ इतकेच पाणी मंगळवेढा तालुक्यासाठी मिळते. सदर पाणी येत असताना वरील तालुक्यातील शेतकरी पाणी अडवून कॅनॉल फोडून पाणी घेतात. सदर बाबतीत संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांच्या वेळोवेळी बैठकीत पाठपुरावा करुन व आवाज उठवूनसुद्धा हे पाणी मिळत नसल्याची तक्रार आमदार महोदय यांनी यावेळी मांडून लवकरात लवकर हे पाणी दिले जावे अशी मागणी लावून धरली.

तसेच टेल टू टेल पाणी वाटप कलम१४४ चा अवलंब करुन हे पाणी मंगळवेढा तालुक्यासाठी उपलब्ध करुन द्यावे असे पालकमंत्री ना.गोरे साहेब यांनी आदेशीत केले आहे. त्याचबरोबर म्हैसाळ पाणी वाटप योजनेअंतर्गत मंगळवेढा तालुक्यातील १९ गावांना आवश्यक दाबाने योग्य ते पाणी मिळवण्याची तरतूद लवकरात लवकर करण्यात यावी.

आरटीओ खात्यांतर्गत स्थानिक वाहने व शेतकऱ्यांच्या वाहनांवर दंड आकारण्यात येऊ नये. टेंभू योजनेचे पाणी माण नदीत सोडून पंढरपूर मंगळवेढा तालुक्यातील धरणे भरून मिळावीत. घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी ५ ब्रास मोफत वाळू उपलब्ध करून देण्यात यावी.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेमधील पंढरपूर आणि मंगळवेढा येथील जवळपास दोन हजार शेतकऱ्यांचे प्रस्ताव जिल्हा स्तरावर पाठवूनही मंजूर नाहीत सध्या पेरणी काळ सुरु असल्यामुळे ते तात्काळ मंजूर करुन संबंधित शेतकऱ्यांना प्रधानमंत्री सन्मान योजनेचा निधी मिळावा अशी मागणी केली. आंधळगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजने ची काम पूर्ण होत आले आहे परंतु महावितरण आणि एमजीपी यांच्यात समन्वय नसल्यामुळे लोकांना अजूनही पाण्यापासून वंचित राहू लागत आहे.

सर्वसामान्यांची कामं आणि जिल्ह्याचा सर्वांगीण होण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून लवकर मार्गी लावावीत अशा सूचना यावेळी देण्यात आल्या. यावेळी खासदार, जिल्ह्यातील आमदार यांच्यासह जिल्हाधिकारी, कार्यकारी मुख्य अधिकारी, नियोजन अधिकाऱ्यांसह प्रमुख विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## शेलार भावकी द्वितीय वर्धापन दिन सोहळा, श्री सत्यनारायण महापुजा, कुळाचार जागरण गोंधळ उत्साहात





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रायगड,(केतन भोज);शेलार भावकी वर्धापन दिन सोहळा यांच्या संयुक्त विद्यमाने मु.पोस्ट. तळेगाव,ता.तळा,जिल्हा रायगड यांच्या शेलार भावकी बंधूंच्या वतीने या वर्षी द्वितीय वर्धापन दिन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.दि.१७ मे २०२५ रोजी सामुहिक कुलदैवत/ग्रामदैवत पूजन आणि सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले होते.तसेच दि.१८ मे २०२५ रोजी शेलार भावकी कुळाचार जागरण गोंधळ कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.या शुभ प्रसंगी शेलार भावकी बंधूंच्या वतीने गतवर्षी प्रमाणे सामाजिक, शैक्षणिक, क्रिडा,क्षेत्रात दैदिप्यमान कार्य केलेल्या व्यक्तिंना सन्मानित करण्यात आले.मुलांमध्ये शिक्षणाची रुची निर्माण होऊन ते आपल्या भावी आयुष्यात यशस्वी व्हावीत त्याकरता प्रोत्साहन म्हणून त्यांचा यथोचित यावेळी गुण-गौरव करणे आणि क्रिडा क्षेत्रातही त्यांना विशेष नेपुण्य मिळावे,तसेच सामाजिक क्षेत्रातही सामाजिक सेवा करणाऱ्या व्यक्तीस प्रोत्साहन देणे हा त्यांचा एकमेव उद्देश आहे.यावेळी दि.१७ मे २०२५ रोजी सकाळी ८ वाजता कुलदैवत/ग्रामदैवत यांचे पूजन करून त्यानंतर ११ वाजेपर्यंत सर्व ग्रामदेवींची ओटी भरणे कार्यक्रम करण्यात आला. गावातील सर्वच ग्रामदेवता यांची वाजत गाजत मिरवणूक काढत ओटी भरणे हा कार्यक्रम गेल्यावर्षी पहिल्यांदाच शेलार भावकीकडून करण्यात आला होता.आणि पुढे ही ते कायम स्वरूपी सर्वच स्थरातील लोकांनी चालू ठेवले आहे.यावेळी महिला/पुरुष तसेच लहान थोर मंडळी यांची उपस्थिति वाखण्याजोगी होती. त्यानंतर दुपारी ११ ते ०१ वाजेपर्यंत श्री सत्यनारायण महापूजा संपन्न झाली. तद्नंतर दुपारी ०३ ते ०५ वाजे दरम्यान महिलांसाठी हळदी कुंकू सभारंभ आयोजित करण्यात आला.तसेच सायंकाळी ०५ ते ०७ वाजेपर्यंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा आणि सामाजिक सेवा करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार सोहळा पार पडला. विद्यार्थी गुणगौरव सोहळा निमित्त विद्यार्थी यांना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले तसेच मान्यवरांचे शाळ व श्रीफळ देऊन त्यांचा सुद्धा यावेळी यशोचित सन्मान करण्यात आला.पुढे रात्री ७ ते १० वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. आणि शेवटी पुढे रात्री १० नंतर सांस्कृतिक कार्यक्रम व प्रासादिक भजन आयोजित करण्यात आले होते.त्याच बरोबर प्रा.सुनील देवरे,नागोठणे व्याख्याते-वारकरी विचार मंच रायगड यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.यावेळी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे आणि शेलार मामांचे विचार आणि कार्य आजच्या पिढीला कसे मार्गदर्शक आहेत.तसेच शेलार भावकीने एकजुटीने कसे रहावे.नातीगोती कशी जपावी भावी पिढी साठी संस्कार,शिक्षण,आरोग्य,रोजगार यासाठी कसे कार्य करावे भावकीची एकी कशी अबाधित ठेवावी याचे अनमोल मार्गदर्शन केले.तसेच दुसऱ्या दिवशी दि.१८ मे २०२५ रोजी सकाळी ०९ वाजता शेलार भावकी कुळाचार जागरण गोंधळ कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पाडण्यासाठी कार्यकारणी मंडळ समिती अध्यक्ष-श्री. दिनेश हरीशचंद्र शेलार, उपाध्यक्ष- दत्ताराम रमेश शेलार,मनोज वसंत शेलार,सचिव-महेश लक्ष्मण शेलार, कुंदन लक्ष्मण शेलार,खजिनदार-गणेश पांडुरंग शेलार,सल्लागार-रोहिदास बाबु शेलार तसेच कार्यकारणी मंडळी गोपाळ शेलार,दिनेश शेलार,परशुराम शेलार,दिलीप शेलार,लक्ष्मण शेलार,धोंडू शेलार,संतोष लक्ष्मण शेलार तसेच सर्वच सदस्य मंडळी महिला व पुरुष यांनी कठोर परिश्रम घेतले.



## श्वान वृत्ती सोडून मनुष्यत्वाची धारणा करा : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जनसंपर्क कार्यालय, ४, साकेत नगर, छत्रपती संभाजी नगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर ११ मे १९४१ ला मुंबई येथे म्हणाले होते की, श्वान वृत्ती सोडून मनुष्यत्वाची धारणा करा. या विधानाच्या ८४ व्या वर्धापनानिमित्त १०९ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा ११ मे २०२५ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे समन्वयक इंजिनिअर किशोर पाटील अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, केवळ मागण्याची प्रवृत्ती जोपासने हे कुत्र्याचे जीवन आहे. ते नाकारून आपण मनुष्यत्वाची धारणा केली पाहिजे. वर्तमानपत्र चालविण्याच्या अनुषंगाने खंत व्यक्त करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर विपरीत परिस्थितीत सुद्धा जनता हे पत्र चालविण्यावर ठाम होते. कारण तेच एकमेव प्रसार माध्यमांचे साधन होते. ज्यातून जनतेपर्यंत संदेश पोहचवला जात होता.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना प्रतीक पंचशील म्हणाले की, आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी म्हणून त्यांनी दिलेल्या सर्व आदेशाचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे.

प्रमुख वक्ते म्हणून बोलताना फुले शाहू आंबेडकराईट विचारांचे प्राध्यापक ग. ह. राठोड म्हणाले की, आता समाजात आर्थिक सक्षम लोक निर्माण होत असल्याने त्यांनी स्वत:मध्ये दान वृत्ती विकसित करून संस्थाने, प्रतिष्ठाने स्वबळावर चालविली पाहिजेत. आपण आपल्या समाजाला सढळहस्ते मदत केल्यास विकास व्हायला वेळ लागणार नाही. चौथ्या वर्गात शिकत असताना गुलामगिरी हे पुस्तक वाचनात आल्याने मनुवाद्यांच्या विरोधात भूमिका घ्यायला सुरुवात केली होती. १९९८ पर्यंत नरेंद्र दाभोळकरांबरोबर अंधश्रद्धा निर्मूलनासह समाजजागृतीचे काम केले आहे. तेव्हा पासून फुले शाहू आंबेडकराईट विचारांचे कार्य सुरू आहे. डॉ. अशोक गायकवाड यांच्या प्रकाशनाच्या माध्यमातून ३० पुस्तके प्रकाशित केली आहेत. अशाप्रकारे प्रबोधनाचे कार्य सर्व स्तरावर सुरू आहे.

**फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलची १०९ वी शतकोत्तर वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न**

यांप्रसंगी महादेव डांबरे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना इमारत बांधत असताना तत्कालीन परिस्थितीत युद्धजन्य परिस्थितीमुळे अडीच लाखाचे बजेट चार लाख रुपये झाले तेव्हा सेवासदन संस्थेचा आदर्श घेऊन आपण वाढीव फंड निर्माण केला पाहिजे असे म्हणाले होते. तसेच काँग्रेसमध्ये जाऊन चार लाख काय दहा मिळविता येतील परंतु ही श्वान वृत्ती आहे. त्याची जोपासना करता येणार नाही. काळानुसार परिस्थिती बदलत असते याचे भान ठेवून आता आपण खेड्यापाड्यात तांड्यावर जाऊन बुद्ध फुले शाहू आंबेडकर पेरियारासह सर्व महापुरुषांचे परिवर्तनवादी विचार समजावून सांगितले पाहिजे.


प्रास्ताविकात उद्योजक मिलिंद बागूल म्हणाले समाजात चळवळी विषयी फार अनास्था पहायला मिळत आहे. वर्तमानातील पत्रकारितेला समाजाच्या सुखदु:खाशी काही देणे घेणे उरलेले नाही. सुत्रसंचालन महादेव डांबरे यांनी केले. सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या तर स्टडी सर्कलच्या वतीने उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. या कार्यशाळेला प्रतीक पंचशील, इंजिनिअर किशोर पाटील, प्राध्यापक ग. ह. राठोड, उद्योजक मिलिंद बागूल, संग्राम घाटे, जयपाल सिंह राठोड इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने कार्यशाळा हर्षोल्हासात संपन्न झाली.

**संशोधन अधिछात्रवृत्तीसाठी गेली चार वर्षे झाली पाठपुरावा**

**प्रशासनाने संशोधकांची घेतली दखल**

# सामजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी २०१८ बॅच मधील (पीएचडी २१४) संशोधक विद्यार्थ्यांना यूजीसी नियमानुसार एकूण पाच वर्ष फेलोशिप देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाला दिले तातडीने आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुणे : बी. ए. एन.आर. एफ-२०१८ अधिछात्रवृत्ति पीएच.डी. संशोधक विदयार्थी कृति समिती यांच्या मार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे यांच्याकडे यु.जी.सी च्या नियमांनुसार ५ वर्षे संशोधन अधिछात्रवृत्तीसाठी गेली चार वर्षे झाली पाठपुरावा करित आहे. तरी देखील त्यांना अजून पर्यंत न्याय देण्यात आला नाही.

बार्टी ही संस्था राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना संशोधनाकरिता अर्थसहाय्य करीत असते. सन २०१३ पासून यु.जी. सी. च्या नियमांनुसार पीएच.डी संशोधनकांना अधिछात्रवृत्ती देण्याची तरतूद करण्यात आली व राज्यातील अनु.जाती प्रवर्गातील संशोधकांना एक नवी दिशा निर्माण झालेली आहे.

इछठऋ -२०१८ पीएच. डी. २१४ संशोधकांनी आपल्या न्यायिक हक्कासाठी यु.जी.सी नियमांनुसार पीएच.डी.साठी पाच वर्ष अधिछात्रवृत्ती मिळण्याकरिता गेल्या ४ वर्षापासून ५ वेळेस आमरण उपोषणे, ५९ दिवस धरणे आंदोलने व चैत्यभूमी-दादर (मुंबई) या ठिकाणी जलसमाधी आंदोलन इत्यादी मार्गाचा अवलंब केल्यानंतर प्रशासनाने संशोधकांची दखल घेतली.

सद्याचे सामाजिक न्याय मंत्री, मा. संजय शिरसाट साहेब यांना संशोधकांनी फेलोशीप संदर्भात अडचणी सांगितले असता तातडीने प्रस्ताव सादर करण्याचे आदेश मंत्री महोदय यांनी सामाजिक न्याय विभागाला दिले.

विद्यार्थांची मागणी नियमबाह्य नाही हे खालील प्रमाणे-

१. यु.जी.सी/ एन.एफ.सी, पीएच.डी. करिता ५ वर्षे अधिछात्रवृत्ती प्रदान करते, तसेच बार्टी यु.जी.सी/ एन.एफ.सी च्या नियमांना अनुसरून अधिछात्रवृत्ति प्रदान करते.

२. बार्टीकडून २०१८ च्या बॅचेचे अवार्ड लेटर २०२० मध्ये देण्यात आले आहे. म्हणून हे विद्यार्थी आपोआपच इछठऋ-२०१९ च्या नियमावलीनुसार पाच (०५)वर्ष अधिछात्रवृत्तीसाठी पात्र होतात. तसेच बार्टीने यु.जी.सी/ एन.एफ.सी नियमानुसार वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार अधिछात्रवृत्ती रक्कमेत बदल करून वाढीव रक्कम २०१८ च्या पीएच.डी. संशोधकांना अदा केली आहे.

३. तीन सदस्यीय समितीच्या शिफारशी नुसार बी.ए.एन.आर.एफ -२०१८ अंतर्गत असलेल्या एम.फिल.च्या विध्यार्थ्यांना पुढे पीएच.डी. करीता देखील फेलोशिप नियमित देण्यात आली. म्हणजेच एम.फिल. करीता २ वर्ष आणि पुढे पीएच.डी. करिता ३ असे एकूण पाच वर्ष फेलोशिप देण्यात आली आहे. ती यु.जी. सी च्या नियमानुसार योग्य आहे. परंतु त्याच बी.ए.एन. आर.एफ -२०१८ अंतर्गत असलेल्या २१४ पीएच.डी. विद्यार्यांची पाच वर्षाची मागणी असलेला विषय या बैठकीत फेटाळण्यात येतो हा अन्याय नाही का?

४. प्रत्येक नियामक मंडळाच्या (बी.ओ.जी) बैठकीमध्ये फेलोशिप संदर्भातील प्रश्नांबाबत णत्रऋ च्या नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी. असे नमूद केले असताना देखील बी.ए.एन.आर.एफ -२०१८ पीएच.डी. २१४ संशोधकांचा प्रश्न चार वर्षापासून मार्गी लागलेला नाही. महत्वाचे म्हणजे बी.ए.एन.आर.एफ -२०१८ ही बॅच कोविड-१९ व लॉकडाऊन या गोष्टीमुळे विशेष बॅच म्हणून उल्लेख करून न्याय द्यावा.

५. बार्टी प्रशासनाने बी.ए.एन.आर.एफ -२०१९ पासून यु.जी. सी नियमानुसार ५ वर्ष अधिछात्रवृत्ती देण्याचा निर्णय घेतला आहे. ही मागणी २०१८ चे विद्यार्थी करीत होते. त्याचा २०१८ च्या विद्यार्थांना लाभ दिला नाही. त्यामुळे २०१८ बॅच संदर्भात ही अन्यायकारक बाब आहे.

६. २३ ऑगस्ट, २०२४ रोजी मा.मुख्यमंत्री साहेब, बार्टी प्रशासन, सामाजिक न्याय विभागाचे सचिव, संबंधित अधिकारी व विद्यार्थी यांच्यामध्ये झालेल्या मीटिंग मधील चर्चेमध्ये एकूण सहा विषय मांडलेले होते. आणि ते सर्व विषय मार्गी लावण्याचे आदेश मुख्यमंत्री साहेबांनी दिले होते. त्यापैकी पाच विषय मार्गी लागले असून, फक्त बी.ए.एन.आर.एफ -२०१८ पीएच.डी.चा एकच विषय प्रलंबित आहे. त्यासाठी लागणारा निधि २३, २३, १८, ४००/- (अक्षरी रुपये - तेवीस कोटी तेवीस लाख अठरा हजार चारशे फक्त) बार्टीसंस्थेकडे उपलब्ध असल्याचे पत्र सामाजिक न्याय विभाग मुंबई व सबंधित विद्यार्थांना देण्यात आले होते. तरी सुद्धा आमचा विषय प्रलंबित आहे. तो तुम्ही मार्गी लावून न्याय द्यावा. असे सामाजिक न्याय मंत्री, मा. संजय शिरसाट साहेब यांना संशोधकांनी सांगितले.

**मा. तत्कालीन मुख्यमंत्री व सामाजिक न्यायमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांनी आदेश दिल्यानंतर बार्टी प्रशासनाने संबंधित विषय मार्गी लावण्याचे आश्वासनात्मक पत्र दिले. तसेच बार्टीकडे निधि उपलब्ध असल्याकारणानेप्रशासनांवर बी.ए.एन.आर.एफ -२०१८ पीएच.डी. २१४ संशोधकांचा आर्थिक भार पडणार नाही. असे असून देखील विद्यार्थांचा प्रश्न अजूनही सामाजिक न्याय विभाग मुंबई मंत्रालायामध्ये प्रलंबित आहे.**

७. २०१८ ते २०२४ या कालावधी दरम्यान ४०% बी.ए.एन.आर.एफ -२०१८ पीएच.डी. संशोधकांनी आपले संशोधन कार्य पूर्ण करून प्रबंध सादर केले आहेत. परंतु बार्टी व प्रशासन यांच्या संथगती धोरणांमुळे संशोधन कार्य थांबवणे किंवा ते अपूर्ण सोडणे विद्यार्थ्यांच्या हिताचे नव्हते, त्यांनी आर्थिक समस्यांना तोंड देऊन, प्रसंगी कर्ज, उसनवार करून आपले संशोधन कार्य पूर्ण केले आहे. ही अभिमानाची बाब नाही का?

म्हणून बी.ए.एन.आर.एफ -२०१८ (२१४) संशोधकांना यु.जी.सी/ एन.एफ.सी नियमांनुसार पाच वर्षे किंवा प्रबंध सादर केलेली दिनांक, जे आधी असेल तिथंपर्यंत अधिछात्रवृत्तीचा लाभ मिळावा. या कारणाने विद्यार्थ्यांनी मा. संजय शिरसाट साहेब यांना २०१८ पीएच.डी संशोधक विद्यार्थ्यांना न्याय देण्यासंदर्भात संभाजीनगर या ठिकाणी भेटून सांगितले असता, साहेबांनी तातडीने प्रस्ताव सादर करण्याची आदेशही दिले. त्या पद्धतीने प्रस्ताव एक महिना झाला प्रधान सचिव साहेब यांच्याकडे प्रलंबित असलेले समजते. साहेब येत्या आठ दिवसात विद्यार्थांचे प्रश्न मार्गी लावतील अशी आशा असून बी.ए.एन.आर.एफ -२०१८ च्या संशोधक विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. साहेबांच्या भेटी दरम्यान बार्टी संशोधक कृती समितीचे विद्यार्थी प्रकाश दवणे, सुरेन कांबळे, सरोज खंदारे, सुनिता शेजुळ, छाया बनसोडे, अंकुश गवई, प्रवीण सुतार, प्रफुल्ल कांबळे, किरण मगर इ. अधिक संशोधक विद्यार्थी संभाजीनगर या ठिकाणी उपस्थित होते.